# नियमित दिवाणी मुकदमा क्र.२३/२०१८ मधील नि.१८ खालील आदेश

## (यशवंत भानुदास चव्हाण *विरुध्द* मधुकर तानाजी जाधव वगैरे-२)

## (CNR-MHSN090002002018)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून कैफियत दाखल करुन घेणेकरिता अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द जाहीर ठरावाचा व कब्जासाठीचा दावा मे.कोर्टात दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांना वेळेत कैफियत देणेची होती. परंतु, प्रतिवादी क्र.१ हे व्यवसायानिमित्त परराज्यात असल्याने दाव्याबाबत आवश्यक ती माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध करता आली नाहीत. प्रतिवादी क्र.१ व २ यांना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे त्यांना वेळेत कैफियत द्यावयाची असते याची माहिती नसल्याने वकीलांना वेळेत माहिती देवू शकले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत मुदतीत देता आलेली नाही. प्रतिवादी यांनी कैफियत देणेस टाळाटाळ केली नाही, कोणताही निष्काळजीपणा अगर हलगर्जीपणा कधीही केला नाही व आवाक्याबाहेरच्या अडचणी निर्माण झाल्यामुळे वेळेवर कैफियत देता आली नाही. प्रतिवादी यांची कैफियत दाखल करुन घेतलेस वादीचे काहीएक नुकसन होणार नाही. उलट कैफियत दाखल घेतलेस न्यायदानास मदत होणार आहे. मात्र प्रतिवादींची कैफियत दाखल करुन न घेतलेस प्रतिवादी यांचे पैशाने न भरुन येणार असे अपरिमीत नुकसान होणार आहे व वादीचे गैरकृत्यामुळे प्रतिवादींचे हितास बाधा येणार आहे. सबब प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कैफियत देणेस झालेला विलंब माफ होवून कैफियत रेकॉर्डवर घेणे बाबत विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीतर्फे विधीज्ञांनी नि.२० कडे म्हणणे देवून प्रतिवादीचे अर्जास विरोध दर्शविला आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादींनी कैफियत उशीराने का सादर केली याबाबत कोणतेही, कसलेही संयुक्तिक असे कारण दिलेले नाही. प्रतिवादी क्र.१ हा परराज्यात असला तरी प्रतिवादी क्र.२ हा कायमपणे गावी राहत असून त्याला संपुर्ण माहिती आहे. प्रतिवादींनी जाणुनबुजून कैफियत देणेस उशीर केलेला आहे व कैफियत देणेस अक्षम्य असा निष्काळजीपणा केलेला आहे. या सर्व कारणांचा विचार करता प्रतिवादींचा विंलब माफीचा अर्ज खर्चासह रद्द करणेत यावा. यदाकदाचित मे.कोर्ट सदर अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत आलेस वादीस निष्कारण त्रास होत असल्याने प्रतिवादींना जास्तीत जास्त दंड करणेत यावी व ती वादी यांना मिळावी अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी त्यांचे अर्ज व म्हणणेनुसार युक्तिवाद केला. अभिलेख पाहिला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द डिक्लेरेशन व कब्जासाठी केलेला आहे. दाव्याचे अवलोकन केले असता वादींनी प्रतिवादी यांना दस्त उलटून देणेबाबत विनंती केली असता प्रथम कबुल करुन पुढे टाळाटाळ सुरु केली त्यानंतर वादींनी प्रतिवादींना दि.१९.०७.२०१७ रोजी व दि.१४.०९.२०१७ रोजी नोटीसा देवून दुय्यम निबंधक कार्यालयात हजर राहून दस्त वादींचे नांवे करुन देणेची विनंती केली असता प्रतिवादी हजर राहिले नाहीत व दस्त करुन दिला नाही असे नमूद आहे. याकामी प्रतिवादी क्र.१ व २ यांना दाव्यातील समन्स बजावणी झालेनंतर प्रस्तुत प्रतिवादी नि.१५ कडील वकीलपत्रानुसार दि.२२.१०.२०१८ रोजी हजर झाले आहेत. परंतु, सदर प्रतिवादींनी मुदतीत त्यांचे कैफियत मांडलेले नाही असे स्पष्ट होते. सबब, प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियत मांडणेस विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांनी दिलेले कारण योग्य व संयुक्तिक आहे. दाव्याचे स्वरुप व मागण्या पाहता दाव्याचे अंतिम गुणदोषात्मक न्यायनिर्णयाकरिता प्रतिवादी यांचे कैफियत याकामी सामील होणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दावा गुणदोषावर निर्णय होणेस मदत होणार आहे. या सर्वाचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## :: आदेश ::

१. प्रतिवादी क्र.१ व २ यांचा **नि.१८** कडील अर्ज प्रत्येकी दंड रक्कम रु.१००/– वादीस देणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी दंड रक्कम भरलेनंतर प्रतिवादी यांना कैफियत देणेस झालेला विलंब माफ करणेत येवून कैफियत याकामी सामील करणेत येत आहे.

स्वाक्षरी/–

**तासगांव.** **(श्रीमती एस.एस. मांजरेकर)**

**दि.२९.०३.२०१९** **सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, तासगांव.**